**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/२९/२०२४

दिनांक -२४.०२.२०२५

**प्रति,**

१. गणपती कुशाबा सोलनकर

२. आप्पासो कुशाबा सोलनकर

दोघे रा. माडग्याळ,ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. कुशाबा महानिंगा सोलनकर

२. कृष्णा कुशाबा सोलनकर

३. पार्वती अर्जुन टिळे

४. आक्कुबाई कलाप्पा देवकते मयत वारस

४/१. आनंदा कलाप्पा देवकते

४/२. सिध्दाप्पा कलाप्पा देवकते

४/३. शांताप्पा कलाप्पा देवकते

४/४. लक्ष्मीबाई गणपती सोलनकर

४/५. संपदा पाटालोबा सरगर

अ.क्र.१,२ रा. माडग्याळ, ता.जत जि.सांगली

अ.क्र.३ रा.कुरघोट, ता.दक्षिण सोलापूर जि.सोलापूर

अ.क्र.४/१ ते ४/३ रा.सादेपूर ता.जत जि.सांगली

अ.क्र.४/५ रा.मोटेवाडी को.बो ता.जत जि.सांगली .... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**वाद मिळकतीचा तपशिल**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| मायथळ | जत | २०२/२ | ०१ हे. ६२ आर.<br>पो.ख ० हे. १० आर. | ०० हे. ५४ आर.<br>पो.ख ० हे. ०३ आर. | ९६३ |
| | | २०३ | ०२ हे. २० आर.<br>पो.ख ० हे. ०० आर. | ०० हे. ७३ आर.<br>पो.ख ० हे. ०० आर. | |

**निकालपत्र**

मौजे.मायथळ, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर २०२/२ व २०३ या मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, वळसंग यांनी फेरफार नंबर ९६३, प्रकरणी क्र.तक्रार रजि.क्र.२२/२०२३ दिनांक १८.१२.२०२३ अन्वये दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. खालील कोर्टाचा निर्णय हा पुर्णता न्याय व नैर्सगिक न्याय तत्वाचे विरोधात एकतर्फी दिलेला आहे. महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे तरतुदींचा तसेच इतर कायद्यातील कोणत्याही तरतुदीचा

व Record of Rights चा काही एक विचार केला नाही. हिंदु कायदा, हिंदु वारसा कायद्याच्या तरतुदीचा विचार न करता फे.नं. ९६३ ची नोंद मंजुर करणेत चुक केली आहे.

२. वडीलार्जित जमीनीमध्ये वाटप झाले शिवाय वा इतर सहहिस्सेदार वारसांची दस्तास मान्यता, संमत्ती घेतलेशिवाय झालेला व्यवहार हा कायदेशिर ठरत नाही. याचा विचार खालील कोर्टानी केलेला दिसुन येत नाही. सदरचे बक्षीसपत्र पाहता त्यातील तबदील केलेले क्षेत्र वाटप झालेले नसताना कायदेशिर हिश्यापेक्षा ही जादा क्षेत्राची तबदीली केलेचे दिसुन येते. त्यामुळे या कारणास्तव सुध्दा सदरचे बक्षीसपत्र हे मुलतःच बेकायदेशिर असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येत असताना खालील कोर्टानी चुकीच्या पध्दतीने सदरचा फेरफार मंजुर केल्याचे दिसुन येते.

३. खालील कोर्टाचा फे.नं. ९६३ ची नोंद मंजुर करणेचा आदेश या अपेलंट यांचेवर घोर अन्यायकारक असुन सदर आदेशामुळे अपेलंट यांना आपल्या न्याय हक्काच्या क अधिकाराच्या वडीलार्जित मिळकतीस मुकणेची वेळ आलेली आहे. तसेच सदर बेकायदेशिर बक्षीसपत्राचे आधारे वर नमुद मिळकतींचे तबदीली होण्याची भिती देखील निर्माण झालेली आहे.

**जाबदार ०१ यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत ही जाबदार क्र. १ यांनी जाबदार क्र. २ यांना रजिस्टर बक्षीसपत्राने दिलेली आहे. या बक्षीसपत्राची नोंद गावचे रेकॉर्डला फे.नं. ९६३ ने झालेली असुन त्याबाबत तक्रार रजिस्टरचे काम चालून सदरची नोंद मंडळ अधिकारी वळसंग ता. जत यांनी मंजुर केलेली आहे. त्याप्रमाणे बक्षीसपत्र करून घेणार जाबदार क्र. २ यांचे नाव दावा मिळकतीस दाखल झालेले आहे. बक्षीपत्राप्रमाणे दावा मिळकत जाबदार क्र. २ यांच्या प्रत्यक्ष कब्जेवटिस आहे. दावा मिळकतीत जाबदार क्र. १ यांची सद्या कोणतीच मालकी व वहिवाट नाही.

२. जाबदार क्र.२ व त्यांची मुले जाबदार क्र.१ यांची चांगल्या प्रकारे व्यवस्था करत असून जेवणखाण, कपडालत्ता व औषधोपचार हे जाबदार क्र.२ व त्यांचे घरचे लोक करीत असतात. त्या प्रेमापोटीच जाबदार क्र.१ यांनी दावा मिळकत जाबदार क्र.२ यांना बक्षीसपत्राने दिलेली आहे. जाबदार क्र.१ यांची सध्या प्रकृती चांगली असून बक्षीसपत्र हे समजुन उमजुन व योग्य मानसिक स्थिती असताना जाबदार क्र. २ यांना करून दिलेले आहे. ते जाबदार क्र.१ यांना मान्य व कबूल असून त्याबाबत जाबदार क्र. २ अगर त्यांच्या कुटुंबियांनी जाबदार क्र. १ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणलेला नाही.

३. अपिलार्थी यांनी केलेले अपिल व त्यातील कथन जाबदार यांना मान्य व कबूल नाही. त्यामुळे प्रस्तुतचे अपिल फेटाळून लावणेत यावे व मंडळ अधिकारी वळसंग ता. जत यांनी बक्षीसपत्रावरून करणेत आलेली फे.नं. ९६३ ची नोंद मंजुर करणेबाबत जो आदेश केलेला आहे तो कायम करणेत यावा.

**जाबदार ०२ यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. जाबदार क्र. १ हे अपिलार्थी व जाबदार क्र. २ यांचे वडील आहेत. जाबदार क्र. १ यांचा सांभाळ जाबदार क्र.२ व त्यांची मुले करीत आहेत. त्याप्रेमोपाटी जाबदार क्र. १ यांनी दावा मिळकत जाबदार क्र. १ यांचे नावे दि. १४/०७/२०२३ रोजी रजिस्टर बक्षिसपत्राने दिलेली आहे. जाबदार क्र.१ यांनी जाबदार क्र.२ यांच्या नावे दि. १४/०७/२०२३ रोजी जे रजिस्टर बक्षिसपत्र करुन दिलेले आहे. ते रजिस्टर नोंदणीकृत दस्त असून ते कोणत्याही सक्षम न्यायालयानी रद्दबातल ठरवलेला नाही. त्यामूळे रजिस्टर बक्षिसपत्रावरुन फेरफार नं.९६३ ची नोंद मंजूर करणेबाबत मंडळ अधिकारी, वळसंग यांनी जो आदेश केलेला आहे तो योग्य व बरोबर आहे.

२. जाबदार क्र.१ यांनी जाबदार क्र.२ यांना जे रजिस्टर बक्षिसपत्र करुन दिलेले आहे ते रजिस्टर बक्षिसपत्र व त्यावरुन करणेत आलेली फेरफार नं. ९६३ ची नोंद बक्षिसपत्र करुन देणार जाबदार क्र. १ यांना मान्य व कबूल असून त्यांची त्याबाबत कोणतीच तक्रार नाही. त्यामूळे अपिलार्थी यांना रजिस्टर बक्षिसपत्रावरुन करणेत आलेल्या फेरफार नं. ९६३ चे विरुध्द हरकत करणेचा कोणताही कायदेशीर संबंध

येत नाही. दावा मिळकत ही जाबदार क्र.१ यांच्या नावे दाखल असून जाबदार क्र.१ यांनी समजून उमजून जाबदार क्र.२ यांना बक्षिसपत्र करुन दिलेले आहे. या दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकामध्ये अपिलार्थी यांची नावे दाखल झाली. त्यामूळे जाबदार क्र. १ यांनी जाबदार क्र.२ यांना जे रजिस्टर बक्षिसपत्र करुन दिलेले आहे त्या रजिस्टर बक्षिसपत्रास जाबदार यांची संमती घेणेचा कोणताही प्रश्न निर्माण होत नव्हता व नाही. याबाबत जाबदार यांनी केलेली तक्रार पूर्णपणे चुकीची आहे.

३. जाबदार क्र.१ यांनी जाबदार क्र. २ यांच्या नावे करून दिलेले बक्षिसपत्र हे रजिस्टर असून ते कोणत्याही सक्षम न्यायालयानी रद्दबातल ठरवलेले नाही. झालेले बक्षिसपत्र व त्यावरुन करणेत आलेल्या फेरफार नं.९६३ च्या नोंदी विरुध्द बक्षिसपत्र करुन देणार जाबदार क्र. १ यांची कोणतीच तक्रार नाही. रजिस्टर बक्षिसपत्राप्रमाणे जाबदार क्र.२ यांचे नाव मालक म्हणून कब्जेदार सदरी दाखल झालेले आहे. बक्षिसपत्राप्रमाणे दावा मिळकत जाबदार क्र.२ यांच्या प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीस आहे. झालेले रजिस्टर बक्षिसपत्र कोणत्याही सक्षम न्यायालयानी रद्दबातल ठरवलेले नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १४९, १५० प्रमाणे रजिस्टर बक्षिसपत्रावरुन करणेत आलेली फेरफार नं.९६३ ची नोंद मंजूर करणेबाबत मंडळ अधिकारी, वळसंग यांनी दिलेला निर्णय योग्य व बरोबर असलेमुळे तोच आदेश कायम करणे न्यायाने योग्य व उचीत होणार आहे.

**जाबदार ३, ४/१, ते ४/ ५ यांनी आपले लेखी युक्तिवादामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत ही जाबदार क्र.१ यांनी जाबदार क्र.२ यांना रजिस्टर बक्षीसपत्राने दिलेली आहे. या बक्षीसपत्राची नोंद गावचे रेकॉर्डला फे.नं.९६३ ने झालेली असुन त्याबाबत तक्रार रजिस्टरचे काम चालून सदरची नोंद मंडळ अधिकारी वळसंग ता. जत यांनी मंजुर केलेली आहे. त्याप्रमाणे बक्षीसपत्र करून घेणार जाबदार क्र. २ यांचे नाव दावा मिळकतीस दाखल झालेले आहे. बक्षीपत्राप्रमाणे दावा मिळकत जाबदार क्र. २ यांच्या प्रत्यक्ष कब्जेवटिस आहे. दावा मिळकतीत जाबदार क्र. १ यांची सद्या कोणतीच मालकी व वहिवाट नाही.

२. जाबदार क्र.२ व त्यांची मुले जाबदार क्र.१ यांची चांगल्या प्रकारे व्यवस्था करत असून जेवणखाण, कपडालत्ता व औषधोपचार हे जाबदार क्र.२ व त्यांचे घरचे लोक करीत असतात. त्या प्रेमापोटीच जाबदार क्र.१ यांनी दावा मिळकत जाबदार क्र.२ यांना बक्षीसपत्राने दिलेली आहे. जाबदार क्र.१ यांची सध्या प्रकृती चांगली असून बक्षीसपत्र हे समजुन उमजुन व योग्य मानसिक स्थिती असताना जाबदार क्र.२ यांना करून दिलेले आहे. ते जाबदार क्र.१ यांना मान्य व कबूल असून त्याबाबत जाबदार क्र.२ अगर त्यांच्या कुटुंबियांनी जाबदार क्र.१ यांच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव आणलेला नाही.

३. अपिलार्थी यांनी केलेले अपिल व त्यातील कथन जाबदार यांना मान्य व कबूल नाही. त्यामुळे प्रस्तुतचे अपिल फेटाळून लावणेत यावे व मंडळ अधिकारी वळसंग ता. जत यांनी बक्षीसपत्रावरून करणेत आलेली फे.नं. ९६३ ची नोंद मंजुर करणेबाबत जो आदेश केलेला आहे तो कायम करणेत यावा.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, जाबदार यांचा लेखी युक्तिवाद, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे.मायथळ, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर २०२/२ व २०३ या मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी, वळसंग यांनी फेरफार नंबर ९६३, प्रकरणी क्र.तक्रार रजि.क्र.२२/२०२३ दिनांक १८.१२.२०२३ अन्वये दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपिल दाखल केलेले आहे.

२. वाद मिळकतीच्या वादातीत फेरफार क्रमांक ९६३ चे अवलोकन करता, नोंदणीकृत बक्षिसपत्राचा दस्त क्र.३०५३ दिनांक १४.०७.२०२३ ने जाबदार ०१ यांनी जाबदार ०२ यांना गट नंबर २०२/२ मधील ०.५४ हे.आर व गट नंबर २०३ मधील ०.७३ हे.आर क्षेत्र बक्षिसपत्राने हस्तांतरीत केलेले आहे. तथापि वाद

मिळकत ही कुशाबा महानिंग सोलनकर यांच्या पुर्वजांची वडिलार्जित मिळकत आहे. त्यामुळे वाद मिळकतीमध्ये अपिलार्थी यांना जन्मतःच हिस्सा प्राप्त होतो. असे असतांना जाबदार क्र.१ यांनी जाबदार क्र.२ यांना त्यांच्या हिश्यापेक्षा जास्त क्षेत्राचे बक्षिसपत्र करून दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे झालेला व्यवहार हा कायदेशीर ठरत नाही.

३. वाद मिळकतीचे अधिकार अभिलेखाचे अवलोकन करता, इतर हक्कात जाबदार ३ व ४/१ ते ४/५ यांचे पुर्वजांची बिगर कब्जेदार वारसांची नांवे नमूद आहेत. त्यांचा वाद मिळकतीमध्ये हक्क व हितसंबध येतो. त्यांचा हक्क व हितसंबध असतांना त्यांची मान्यता बक्षिसपत्राचे दस्तास घेतलेचे दिसून येत नाही. या कायदेशीर बाबींकडे कानाडोळा करून फेरफार क्र.९६३, ची नोंद क्र.तक्रार रजि.क्र.२२/२०२३ दिनांक १८.१२.२०२३, अन्वये मंजूर करणेची कृती योग्य ठरत नाही. सबब मी,अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**निकालपत्रातील नमुद कारणास्तव प्रस्तुत अपिलार्थी यांचे अपील मान्य करणेत येत आहे. तसेच मंडळ अधिकारी वळसंग यांचा क्र.तक्रार रजि.क्र.२२/२०२३ दिनांक १८.१२.२०२३,रोजीचा निर्णय रद्द करणेत येत आहे. मौजे मायथळ ता.जत येथील फेरफार क्रमांक ९६३ ची नोंद रद्द करणेत येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

सदर आदेशाचा अंमल अपिल कालावधिनंतर करणेत यावा.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

ठिकाण - जत
दिनांक - २४.०२.२०२५

**(अजयकुमार नष्टे)**
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

प्रत -तहसिलदार जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.